**नियमित दिवाणी दावा क्र. २४०/२०२४ मधील नि.क्र.१८ वरील आदेश**
**(लक्ष्मीबाई निंबाळकर व इतर वि. निर्मला बोंद्रे व इतर)**

वादींनी सदरचा अर्ज (नि.क्र.१८) हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दावा दुरुस्ती करीता दाखल केला आहे.

२. वादींच्या प्रस्तुत अर्जातील कथनाप्रमाणे, वादींनी सदरचा दावा हा प्रतिवादींविरुद्ध वाटप होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे. वादी यांनी सदरचा दावा दाखल केल्यानंतर दावा प्रलंबित असताना वादींच्या असे निदर्शनास आले की, प्रतिवादी क्र.१ निर्मला बोंद्रे हिने दावा मिळकतीपैकी काही मिळकत ही त्रयस्त इसम नामे संजीवनी बबन निगडे यांना विक्री केलेली आहे. त्यामुळे संजीवनी निगडे यांना सदरील दाव्याच्या कामी आवश्यक पक्षकार म्हणून सामील करणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक व गरजेचे असल्याने दावा दुरुस्ती करणेस परवानगी असावी अशी विनंती करुन पुढीलप्रमाणे दुरुस्ती मागितली आहे.

३. प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांचे म्हणणे सादर करुन वादींची कथने नाकारली आहेत. तिचे असे कथन आहे की, वादींनी खोटया, लबाडीच्या मजकुराचा अर्ज दाखल केला आहे. वादींना अशी दावा दुरुस्ती मागता येणार नाही. प्रतिवादीने संजीवनी निगडे हिच्या लाभात करुन दिलेले दि.१२.०३.२०२५ रोजीचे खरेदीपत्र हे कायदेशीर आहे. प्रतिवादीने तिच्या मालकीचे क्षेत्र हे संजीवनी निगडे हिला विक्री केलेले आहे. प्रतिवादी ही भाऊसोा निंबाळकर यांची एकमेव व कायदेशीर पत्नी होती. वादी क्र.१ हिच्यासोबत भाऊसोा निंबाळकर यांचा कधीही कायदेशीर विवाह झालेला नव्हता. वादीने खोटया व चुकीचा मजकूराचा अर्ज दाखल केला असल्याने तो नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांचे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादींनी प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी व त्यांचा अविभक्त हिस्सा वेगळा करुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. वादींच्या कथनाप्रमाणे दावा मिळकती यांचे अद्यापपर्यंत वाटप झालेले नाही. प्रस्तुत दावा प्रलंबित असताना असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.१ यांनी दावा मिळकतीपैकी काही मिळकती या संजीवनी निगडे यांना खरेदीखताप्रमाणे विक्री केलेल्या आहेत. अशा परिस्थितीमध्ये प्रस्तुत दाव्यामध्ये वाटपाचा मुद्दा गुणदोषावर निकाली

लागण्यासाठी दावा मिळकतीचे सर्व सहहिस्सेदार व खरेदीदार हे पक्षकार असणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात संजीवनी निगडे या आवश्यक पक्षकार असल्याचे दिसून येत आहे. सदर पक्षकाराला समाविष्ठ न केल्यास प्रस्तुत दाव्याचा कायम स्वरुपी व परिणामी असा निकाल देणे शक्य होणार नाही. याउलट, दुरुस्ती अर्ज मंजूर केल्यास पक्षकारांमधील वाद विषयाचे संपुर्णपणे निराकरण होण्यास मदत होणार आहे. दाव्याचे स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही. त्यामुळे वादींनी दाखल केलेला अर्ज व त्यातील कथने योग्य व संयुक्तीक वाटतात. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे योग्य व उचित होईल. या सर्व बाबी विचारात घेता, खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

१. वादींचा अर्ज (नि.क्र.१८) मंजूर करण्यात येतो.

२. वादींनी विहीत मुदतीत दुरुस्ती करावी व दुरुस्त प्रत अभिलेखावर सादर करावी.

३. वादी व प्रतिवादींनी नोंद घ्यावी व विनाविलंब पुर्तता करावी.

ANIL SITARAM SATOTE
Digitally signed by ANIL SITARAM SATOTE
Date: 2025.10.27 15:00:32 +0530

फलटण. (ए. एस. साटोटे)

दि. २७.१०.२०२५ २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, फलटण